# म्होरकी : आदिवासी स्त्रीमनाचा प्रबुद्ध हुंकार

स्वप्नील बुचडे



मराठी भाषा आणि साहित्य परिप्रेक्ष्यात साठोत्तरी कालखंड अत्यंत महत्त्वाचा आहे. या काळात नवजाणिवा, नव्या प्रवृत्ती व नवीन प्रवाह उदयास आले. त्यामध्ये दलित, ग्रामीण व स्त्रीवादी साहित्य प्रवाह महत्त्वाचे आहेत. विशेषतः साठोत्तरी प्रवाहांमध्ये दलित साहित्याने आशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने क्रांतीविज्ञान घडविले, हे सत्य कोणही नाकारू शकणार नाही. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तत्त्वज्ञान पायाभूत मानून दलित साहित्यामधून विद्रोह, विज्ञान आणि विश्वात्मकता या क्रांतिदर्शी मूल्यांची मांडणी आलेली आहे. दलित साहित्यामध्ये अनुसूचित जाती, विमुक्त-भटक्या जमाती व आदिवासी यांचे भावजीवन मांडलेले आहे. ऐंशीच्या दशकात दलित साहित्य चळवळीतील प्रेरणा घेऊन विमुक्त, भटके व आदिवासींनी आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करत स्वतंत्र साहित्य प्रवाहांची निर्मिती केली त्यामध्ये आदिवासी साहित्य हा अत्यंत सशक्तपणे गतिमान असणारा प्रवाह आहे. आदिवासी साहित्यामध्ये जल, जमीन व जंगल या घटकांशी निगडित अनुभव मांडलेले आहेत. आदिवासी साहित्यात स्त्रियांचे लेखन अल्प असले, तरी त्यामध्ये उषाकिरण आत्राम हे नाव महत्त्वाचे आहे. आदिवासी स्त्रीचे वास्तववादी जीवनानुभव त्यांनी मांडलेले आहेत, याची साक्ष म्हणजे त्यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह होय. प्रस्तुत शोधनिबंधात 'म्होरकी'चे आशयसौंदर्य लक्षात घ्यावयाचे आहे. मात्र तत्पूर्वी आदिवासी माणूस, समाज व संस्कृती याविषयी चर्चा करणे क्रमप्राप्त वाटते.

आदिवासी हा शब्द उच्चारताच डोंगरदऱ्यात राहणारा आणि जंगलातील वेगवेगळ्या वस्तूंच्या माध्यमातून आपली दैनंदिन गरज भागविणारा शोषिक आणि निसर्गसन्मुख समाज आपल्यासमोर येऊन उभा राहतो. आदिवासी साहित्याच्या संदर्भात जसा विचार होतो, तसाच आदिवासी

ईमेल : swapnilsopan88@gmail.com

या संकल्पनेच्या संदर्भातही होताना दिसतो. आदिवासी लोकांसाठी वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या संज्ञा वापरलेल्या आहेत. त्यानुसार डॉ. जी. एस. घुर्ये यांनी तथाकथित मूळचे रहिवाशी' (So Called Aborigines) आणि 'मागासलेले हिंदू' (Backward Hindus)[१] या दोन संज्ञा वापरलेल्या आहेत. भारतीय राज्यघटनेत आदिम लोकांसाठी 'अनुसूचित जमाती' (Scheduled Tribes) ही संज्ञा वापरली आहे. या संज्ञेबरोबरच आदिवासी म्हणजे नेमके कोण हे सांगणाऱ्या व्याख्येचा विचार करता डी. एन. मुजुमदार यांनी समान नाव धारण करणाऱ्या, एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान भाषा बोलणाऱ्या, विवाह व व्यवसाय याबाबत समान निषेधनियमांचे पालन करणाऱ्या आणि परस्पर सहकार्य व परस्पर कर्तव्य यांची एक पद्धतशीर व्यवस्था विकसित करणाऱ्या कुटुंबांचे किंवा कुटुंबांच्या समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिम जमात होय.[२] अशा प्रकारची आदिवासी जमातीविषयी व्याख्या केली आहे. यावरून आपल्याला आदिवासी संज्ञेची व्याप्ती थोडक्यात समजून येईल. आदिवासी साहित्याच्या माध्यमातून विशेषत्वाने आदिवासी संस्कृती प्रदर्शित होते. म्हणून संस्कृतीच्या संदर्भात डॉ. कृष्णा किरवले यांनी मांडलेली भूमिका विचारात घेऊन मग आत्राम यांचा काव्यसंग्रहासंदर्भात विचार मांडता येईल. त्यानुसार विशिष्ट भूखंडावर वास्तव्य करणाऱ्या मानवी समूहाने आपल्या नैसर्गिक व मानवीय गरजांची पूर्तता करण्यासाठी निसर्गनियमांच्या अधीन राहून त्या वातावरणाशी समतोल राखत नियमित केलेली स्वयंपूर्ण मानवीय व्यवस्था म्हणजे संस्कृती होय.[३] अशी व्याख्या केली. ती करत असताना त्यांनी विशिष्ट भूखंडावर निसर्गाशी समतोल राखत आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी निर्माण केलेल्या व्यवस्थेला संस्कृती म्हटले आहे. आदिवासी संस्कृतीच्या संदर्भात विचार करता, आदिवासीच्या धार्मिक रूढी निसर्गपूजेतून निर्माण झालेल्या आहेत. निसर्गात जे जे गूढ, ते ते सर्व पूजनीय असे ते मानतात. या सर्व संदर्भांची मांडणी उषाकिरण आत्राम यांच्या 'म्होरकी'चे आकलन करून घेताना उपयोगी ठरते.

## २

'म्होरकी' हा उषाकिरण आत्राम यांचा पहिलाच कवितासंग्रह १९९७ साली 'गोंडवाना गोंडी साहित्य परिषदे'ने प्रकाशित केला. या संग्रहात त्यांनी आदिवासी जनजीवनाची मांडणी केलेली आहे. म्होरकीबद्दल बोलताना उषाकिरण आत्राम लिहितात की, म्होरकी ही गोटूलातील हुशार, जिद्दी, निर्भिड, स्त्रीनेतृत्व करणारी नायिका 'म्होट्यारीन' या गोंडी नावाने ओळखली जाते, तिचेच नाव मराठीत 'म्होरकी' ठेवले आहे. रानावनातल्या सखीसयांना एकत्र आणून समाजजागृती, स्त्रीजागृती करण्यासाठी, शोषण, अन्याय, अत्याचार, पिळवणूक, छळ या साऱ्यांचा प्रतिकार करण्यासाठी, शोषणाविरुद्ध, अत्याचार-अन्यायाविरुद्ध बंड पुकारून क्रांती करण्यासाठी दलित, कष्टकरी, आदिम, श्रमिक, शोषित, पीडित महिलांचे दुःख वेशीवर टांगण्यासाठी इथल्या समाजव्यवस्थेवर प्रहार करणारी, इथल्या स्त्री जातीवर अन्याय करणाऱ्या सामाजिक रूढी बंधनावर घणाघाती घाव घालणारी माझी म्होरकी जराही भीत नाही.[४] म्होरकीमधील कवितांविषयी त्या लिहितात की, माझी कविता स्वानुभवातून, स्त्री अत्याचार, अन्यायातून, त्यांच्या हुंदक्यांतून-आक्रोशातून निघालेला हुंकार आणि जिवंत सत्य आहे. हिला ना मिळाला कौटुंबिक वारसा, ना मिळाला आप्तगोतावळा. जे अनुभवले, भोगले, पाहिले, जे वाटले, ते लिहिले.[५] अशा रीतीने उषाकिरण आत्राम यांनी आपली म्होरकीबद्दलची भूमिका स्पष्ट केली आहे. यावरून आत्राम यांची कविता जगण्याच्या जीवघेण्या अनुभवातून निर्माण झाल्याचे लक्षात येते.

आदिवासी जनजीवनाबद्दल बोलताना त्या आपल्या 'जगापासून दूर दूर' या पहिल्या कवितेत नमूद करतात की,

तो भटकतो उन्हापावसातून
काट्या झुडपातून - दरी गुहेतून
जगापासून दूर ... कोणती दिशा?
तो थांबला आहे - जगाच्या कडेला
डोंगराच्या आडोशाला
वल्कलाने अब्रू झाकून[६]

अशा पद्धतीने डोंगरकपारीत राहून आपला जीवन चरितार्थ चालवण्याची उमेद घेऊन हा आदिवासी जगतो आहे आणि येणाऱ्या कोणत्याही संकटाला न घाबरता आपली वाटचाल करतो आहे. आदिवासी आपला संसार चालवण्यासाठी फक्त झटतो आहे, ना त्याला देहाची चिंता ना जीवनाची. अशा या दारिद्र्याच्या अवस्थेत मिळेल

ते पोटाला खाऊन प्रसंगी पाणी पिऊन आपली भूक तो भागविताना दिसतो आहे. आणि या सर्वांतून कोणत्याही संकटाला तोंड देत आपली म्हणून वेगळी संस्कृती जपण्याचा त्याचा प्रयत्न सर्वकाळ चालू आहे.

आदिवासी स्त्री आणि तिच्या पतीचा संवाद आत्राम यांनी 'पयसाची लाल आग व्हय' या कवितेत मांडली आहे. या संवादातून त्यांनी समाजातील वासनेच्या दृष्टीची प्रचिती दिली. आदिवासी स्त्री ज्यावेळी आपलं दैनंदिन काम आटोपून थोडं आपल्या शरीराकडे पाहते, त्यावेळी तिचा नवरा तिला समाजातील पुरुषी मनोवृतीची जाणीव करून देतो,

राणे! एवढा शिणगार करू नग...
तुले शिणगार कायले पायजल?
आये त... रानानं फुलावं काट्यांत,
परंण... वास दावू नये
वाटेन – जातसे – तर समद्या डोयाले आग लागन
राणे! तुझ्यावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्यायची
म्हणून म्हणते तू रातराणी होऊ नग!
व्हशील त पयसाची लाल तांबडी आग व्हय!
नायत – बिब्याची फुलं व्हय![७]

एकंदरीत वरील कवितेचा विचार करता प्रस्थापित समाजाबद्दलचा आणि सुधारलेल्या मानसिकतेचा आदिवासी समाजात प्रचंड संताप असलेला दिसतो. इथली व्यवस्था ही स्त्रीचा आदर करणारी नसून तिचा फक्त वासनेच्या आणि तिचा सतत दुसऱ्या स्थानावर विचार करताना दिसून येते. सध्याची परिस्थिती पाहता इथल्या पुरुषी मानसिकतेत झालेला बदल हा इथल्या स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या माध्यमातून दिसतो. आधुनिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यावर सुधारलेल्या आणि एकुणात अत्याधुनिक झालेल्या शहरांमधून स्त्रियांवर होणारे अत्याचार असोत किंवा दलित समाजावर होणारे अत्याचार (उदा. खैरलांजी हत्याकांड) असोत, यातून इथल्या समाजव्यवस्थेची मानसिकता नैतिकतेच्या पातळीवर आपल्याला तपासता येते. या वागणुकीला जबाबदार कोण, असा प्रश्न नीतियुक्त आचरण करणाऱ्याला नक्कीच पडतो. या पार्श्वभूमीवर घडणाऱ्या घटनेचे भांडवल करून राजकारण करण्यासाठी इथल्या सामर्थ्यशाली जाती प्रयत्नशील असतात. त्यांना सतत सत्तेची समीकरणे आपल्या हाती असावीत असे वाटत असते. या सगळ्या घटनांचा विचार करता स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबद्दल बोलताना आत्राम यांनी स्त्रीच्या जीवनाबद्दल काही प्रश्न उपस्थित केले आहेत.

जसजसे मारता येतील तसे रट्ठे हाणतात
बेशरम म्हणून उलटे पाय लटकवूनच
इज्जत विक्रीला, गहान ठेवतात
तिच्या सर्वांग जिंदगीवर हागतात
तिच्या ढुंगणात मिरची आग भरतात
चिलाट्या बोरांडे कमरेला बांधतात
तिच्या झिंज्याचे ते दावे वळतात
तिच्या गुप्तांगापासून स्तनाग्रापर्यंत
आग-चटक्यांचे कशिदा काढतात
तिच्या बेअब्रूची लक्तर गावोगाव फेकतात.[८]

अशापद्धतीने 'जन्म न देणाऱ्या मांची कथा' या कवितेतून त्यांनी स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबद्दल वाचा फोडली आहे. पारंपरिक चालत आलेली स्त्रीची गुलामी आत्राम यांनी मांडली आहे. अत्यंत दाहक वास्तव त्यांनी मांडले आहे. स्त्रीला जीवनात किती वेदना सहन कराव्या लागतात याची प्रचिती वरील ओळींतून आपल्याला येते. या सगळ्या अन्यायाबद्दल आणि अखेर स्त्रीत्वाबद्दलच काही प्रश्न त्या मांडतात. या अन्यायामध्ये माझं स्थान काय, हे शोधण्याच्या केविलवाणा प्रयत्न करतात. लहानपणी आईवर विसंबून असणारी, प्रौढावस्थेत नवऱ्यावर अवलंबून असणारी आणि म्हातारपणी मुलांचा आधार शोधणारी स्त्री ज्यावेळी 'मी वं कोणाच?' असा प्रश्न उपस्थित करते त्यावेळी स्त्रीप्रश्नांची खरी जाणीव होते. या संदर्भात आत्राम म्हणतात की,

तो तडातडा मारायचा थापडा
दणादणा मारायच्या गुध्ये
झिंज्या हालवत म्हणायचा...
तू त पायातली वाहण
बाय... म्हणजी... पायताण !
दाराबाहेरची कुत्री...
तुहा काय अधिकार...?
माय ओ तूच सांग...?
मी वं कोणाची?
ह्याची... त्याची मी वं कोणाची?[९]

समाज मानसिकतेचं वर्णन आत्राम या ठिकाणी करतात.

स्त्रीला सतत दुय्यम स्थानावर ठेवून पुरुषी मनोवृत्ती तिला कायम तिरस्काराच्या नजरेने निरखते आहे. प्रश्न हा आहे की जर तुम्ही मला मारता, कुत्र्यासमान लेखता, पायतानाची जागा दाखवता, तर माझं स्थान काय? मी कोणाची? हा प्रश्न तिच्यासमोर उभा राहतो. या सर्वाची परिणती म्हणून ती विद्रोहाचे हत्यार आपल्या हाती घेते आणि या अन्यायाविरुद्ध बंड करून उठते. याविरुद्ध नेतृत्व करण्यासाठी मी तयार आहे. आपण सावधपणे या अन्यायाला सुरुंग लावू, पण आता माघारी वळायचं नाही. मी तुमचं नेतृत्व करते, तुम्ही माझ्या पाठीमागून या, असा आशय मांडताना 'म्होरकी' या संग्रह शीर्षकाच्या कवितेत आत्राम म्हणतात की,

सखे मला एक सांग
आपण कुठवर असे लाजायचे ग?
चौकाचौकात चोरवाटेवर
शस्त्र उगारून मक्तेदार वाट पाहताहेत
त्यांची उगारलेली शस्त्रे आपण हिसकून घेऊ
आणि पुढे म्हणतात की,
सख्यांनो, सावध व्हा ग पोरींनो!
मी तुमची म्होरकी आहे
फेकून द्या ते फाटक्या पदरचे बुजगावणे
सोडून फेका बंदिस्त माळांचे जोखाडणे
नजरेतील भीती टाकून द्या ।
ही घ्या पेटती मशाल
मी निघाले - पाठीमागून तुम्ही या[१०]

### ३

एकुणात उषाकिरण आत्राम यांनी 'म्होरकी' ह्या संग्रहातून पारंपरिक स्त्रीवेदना मांडल्या आहेत. या कवितासंग्रहाच्या कवितांची मांडणी पाहता आणि स्त्रीचे स्थान पाहता एकूणच भारतीय संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यावर पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान नेहमी परिघावर आणि दुय्यम दर्जा देणारे राहिले आहे हेच दिसते. स्त्रीला देण्यात आलेल्या या दुय्यमत्वातून तिचे पुरुषाच्या तुलनेत असणारे न्यूनत्व दाखवून दिले. विशेषत: भारतीय समाजमानसिकतेने हा स्त्रीच्या विचारावर टाकलेला एक डाव होता असेच म्हणावं लागेल. ज्यात स्त्री ही शतकानुशतके पुरुषकेंद्री समाजव्यवस्थेची बळी ठरली. परिणामी आपल्या दु:खाला वाट करून देण्यासाठी तिने लेखणी उचलली आणि आपले विचार न डगमगता मांडायला सुरुवात केली. आपल्यावरील अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. तिचे मन प्रबुद्ध झाले. अशा आदिवासी मनाचा प्रबुद्ध हुंकार म्हणजे उषाकिरण आत्राम यांचा 'म्होरकी' हा कवितासंग्रह होय.

●

**संदर्भ :**


१. Ghurye G. S. - The Scheduled Tribes, 1963, 3rd,edition.
२. Mujumdar D. N. - Races and culture of india, Bombai popular prakashan, 1958.
३. तुपेरे सारीपुत्र - समाजभाषाविज्ञान आणि दलित कथा वाङ्मय, नवीन उद्योग प्रकाशन, पुणे २०१२,पृ ८.
४. आत्राम उषाकिरण - म्होरकी, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर १९९७, प्र. ८
५. तत्रेव - प्र ८.
६. तत्रेव - प्र ९ .
७. तत्रेव - प्र ११ .
८. तत्रेव - प्र २८ .
९. तत्रेव - प्र ३१ .
१०. तत्रेव -३४.



**राज्यपातळीवरील राजकारणाचा जिल्हा पातळीवर अभ्यास कसा करता येईल, स्थानिक राजकीय संदर्भ आणि त्यांचा राज्य आणि देशाच्या पातळीवरील राजकारणाशी कसा संबंध येतो आणि जिल्हा हे राजकीय-आर्थिक अभ्यासाचे एकक (युनिट) कशाप्रकारे अभ्यासले जाऊ शकते याची विस्तृत मांडणी या पुस्तकात केली आहे.**

**लातूर जिल्ह्याची राजकीय प्रक्रिया**

*(राजकीय, सामाजिक, आर्थिक वाटचाल)*

**विवेक घोटाळे-दत्ता भिसे**

पाने : २२१ । किं. : २०० रु.

The UNIQUE academy

**द युनिक ॲकॅडमी**

वास्तू चेंबर्स, शिरोळे रोड, फर्ग्युसन कॉलेजसमोर, पुणे ४११००४. दू. ०२०२५५३०९५०